कांदा उत्पादक शेतकऱ्यांना प्रति क्विंटल रुपये २००/- अनुदान देणेसाठी आयसीआयसीआय बँकेत बचत खाते उघडण्यास मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

शासन निर्णय क्रमांक: सपस-२०१९/प्र.क्र.१२६/२४स

मंत्रालय, विस्तार, मुंबई-३२

दिनांक: १९ ऑगस्ट, २०१९

संदर्भ:- १) शासन निर्णय, सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग
क्रमांक:- सपस-२०१८/प्र.क्र.३६७ /२४ स,दिनांक २६ डिसेंबर, २०१८

२) शासन निर्णय, सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग
क्रमांक:- सपस-२०१८/प्र.क्र.३६७/२४ स,दिनांक ३१ जानेवारी, २०१९

३) शासन निर्णय, सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग
क्रमांक:- सपस-२०१८/प्र.क्र.३६७/२४ स,दिनांक १५ फेब्रुवारी, २०१९

४) शासन निर्णय, सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग
क्रमांक:- सपस-२०१८/प्र.क्र.३६७/२४ स,दिनांक १६ फेब्रुवारी, २०१९

५) शासन निर्णय, सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग
क्रमांक:- सपस-२०१८/प्र.क्र.३६७/२४ स,दिनांक ८ मार्च, २०१९

६) पणन संचालक,महाराष्ट्र राज्य,पुणे यांचे पत्र क्रमांक. पणन-१३/कांदा अनुदान/२०१८-१९/२०१९/१७४१,दिनांक २२ मे,२०१९

७) शासन निर्णय,सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग,
क्रमांक:- पूरक-२०१९/प्र.क्र.७९/२४ स,दिनांक ७ ऑगस्ट, २०१९

प्रस्तावना:-

राज्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याच्यादृष्टीने दिनांक १ नोव्हेंबर, २०१८ ते दिनांक १५ डिसेंबर,२०१८ या कालावधीत कृषी उत्पन्न बाजार समित्या व प्रसन्ना कृषी मार्केट, पाडळीआळे, अहमदनगर या खाजगी बाजार समितीमध्ये कांदा विक्री केलेल्या शेतकऱ्यांना प्रति क्विंटल रुपये २००/- व जास्तीत जास्त २०० क्विंटल प्रति शेतकरी याप्रमाणे अनुदान दिनांक २६/१२/२०१८ च्या शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आले आहे. सदर कांदा अनुदान कालावधीमध्ये वेळोवेळी वाढ केली असून, सुधारित अनुदान कालावधी दिनांक १ नोव्हेंबर, २०१८ ते दिनांक २८ फेब्रुवारी, २०१९ असा निश्चित केलेला आहे.

सुरुवातीस दिनांक १ नोव्हेंबर, २०१८ ते दिनांक १५ डिसेंबर, २०१८ या कालावधीत कांदा विक्री केलेल्या **१,६०,६९८** लाभार्थी शेतकऱ्यांना अनुज्ञेय अनुदान वितरित करण्यासाठी **रुपये ११४.८०** कोटी आकस्मिकता निधीतून पणन संचालक,महाराष्ट्र राज्य,पुणे यांना उपलब्ध करुन दिला आहे.

उर्वरित कालावधी दिनांक १६ डिसेंबर, २०१८ ते दिनांक २८ फेब्रुवारी, २०१९ या कालावधीतील कांदा अनुदानासाठी **रुपये ३८७,३०,३१,०००** ची पुरवणी मागणी सन २०१९ च्या दुसऱ्या (पावसाळी) अधिवेशनात मंजूर करण्यात आली. सदर अनुदान शेतकऱ्यांना लवकरात लवकर वितरित करणे आवश्यक आहे.

राष्ट्रीयकृत बँकामार्फत सुरुवातीच्या कालावधीतील अनुदान वितरित करण्यासाठी बराच कालावधी लागत असल्याने पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दिनांक २२ मे, २०१९ च्या पत्रान्वये कांदा अनुदान वितरित करण्यासाठी खाजगी बँकेकडे स्वंतत्र खाते उघडण्यास परवानगी देण्याची विनंती केली होती. त्यास अनुसरुन कांदा अनुदान शेतकऱ्यांना वेळीच व पारदर्शकतेने अदा करण्यासाठी आयसीआयसीआय (ICICI) बँकेत बचत खाते उघडण्यास परवानगी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णयः-

सन २०१८-२०१९ या वर्षात राज्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना प्रति क्विंटल रुपये २००/-अनुदान देणेसाठी आयसीआयसीआय बँकेत शुन्य रकमेचे (Zero Balance) बचत खाते उघडण्यास खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून शासन मान्यता देण्यात येत आहे:-

अटी व शर्ती :-

I. कांदा अनुदान योजनेकरीता आयसीआयसीआय बँकेत उघडण्यात येणाऱ्या बचत खात्याचा वापर सदर योजनेचा निधी जमा तसेच वितरित करण्याकरीताच करण्यात यावा.

II. सदर बचत खात्यातून प्राप्त होणाऱ्या व्याजाचा वापर सदर योजनेच्या अंमलबजावणीकरीताच करण्यात यावा.

III. सदर बँक खात्यातील अखर्चित रक्कम शासनाकडे समायोजित करणे आवश्यक राहील.

IV. सदर बँक खात्यातील व्यवहाराचे मासिक/तिमाही ताळमेळ करणे तसेच लेखापरिक्षण करणे आवश्यक राहील.

V. सदर बँक खाते बंद करण्यात आल्यास, त्यामधील शिल्लक रकमेचा ताळमेळ घेऊन शिल्लक अखर्चित रक्कम योग्य त्या शासन लेखाशिर्षाखाली तात्काळ जमा करावी.

२. आयसीआयसीआय बँकेसमवेत आवश्यक तो सामंजस्य करार करण्यासाठी पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. वर नमूद सर्व अटी व शर्तींचे पालन होऊन योजनेच्या अंमलबजावणीबाबत वेळोवळी पणन संचालक,महाराष्ट्र राज्य,पुणे यांनी आढावा घेऊन शासनास अहवाल सादर करावा.

३. सदरचा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक- ३०३/२०१९, कोषा प्रशा-५, दिनांक ९ ऑगस्ट, २०१९ अनुसार त्यांच्या मान्यतेने व सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्यांचा संकेतांक २०१९०८१९१६५३३३२७०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Anoop Kumar

Digitally signed by Anoop Kumar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture and ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=257f78acf3ca20d9e91d7a73a76aa0240463e4aafdd4d13de68918dc20bad8e6, serialNumber=1c2ee608849bdb812849b6c8878f95607059b530ff717c8e39c09d06b394e02b, cn=Anoop Kumar
Date: 2019.08.19 17:04:20 +05'30'

(अनूप कुमार)
प्रधान सचिव (पणन)
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

प्रति ,

i. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबारहिल, मुंबई.
ii. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
iii. मा. मंत्री (सहकार, पणन व वस्त्रोद्योग) मंत्रालय, मुंबई.
iv. मा.राज्यमंत्री (पणन) मंत्रालय, मुंबई.
v. मा. सर्व मंत्री व राज्य मंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
vi. मा. राज्यमंत्री (पणन) यांचे मंत्रालय, मुंबई.
vii. मा.मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
viii. मा.अपर मुख्य सचिव (वित्त) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
ix. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य पुणे.
x. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे (२ प्रती).
xi. कार्यकारी संचालक,महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे .
xii. सर्व विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था.
xiii. सर्व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था.

xiv. अध्यक्ष/सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती (सर्व).

xv. महालेखापाल, महाराष्ट्र-१ /२ (लेखा व अनुज्ञेयता / लेखापरिक्षा), मुंबई/नागपूर,

xvi. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.

xvii. वित्त विभाग, व्यय-२/अर्थसंकल्प-११, मंत्रालय, मुंबई-३२.

xviii. अवर सचिव, १७ स, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.

xix. निवड नस्ती २४ स, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.